RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ६५

दि. ३० जून २०२६, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात

# आज मुंबई विधान भवनावर निळ वादळ धडकणार!

## होश में आओ होश में आओ, महाराष्ट्र सरकार होश में आओ...




**मुंबई / के. एच. हनवते :** महाराष्ट्र सरकारने प्रस्तावित केलेल्या अनुसूचित जाती () उपवर्गीकरणाच्या विरोधात आंबेडकरी चळवळ आणि ५९ जातींच्या विविध संघटनांनी एकत्रित येत राज्य सरकारविरोधात एल्गार पुकारला आहे. उपवर्गीकरणाच्या विरोधात यापूर्वी वेगवेगळ्या संघटनांनी जाहीर केलेले सर्व मोर्चे आता एकत्रित करण्यात आले असून, येत्या ३० जून २०२६ रोजी राज्य विधिमंडळावर एकच ऐतिहासिक संयुक्त महामोर्चा काढण्याचा निर्णय सर्व आंदोलकांच्या बैठकीत एकमताने घेण्यात आला.

यापूर्वी, बीड येथून निघालेल्या लाँगमार्च आंदोलनाने आणि आनंदराज आंबेडकर यांच्या रिपब्लिकन सेनेने २६ जून रोजी मुंबईत मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. तर दुसरीकडे, उपवर्गीकरण विरोधी समितीने ३० जून रोजी आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र, २६ जून रोजी मोहरमची शासकीय सुट्टी असल्याने, मोर्च्याच्या नियोजनात आणि प्रशासकीय पातळीवर कोणतीही अडचण येऊ नये, याकरिता सर्वांच्या सहमतीने २६ जून ऐवजी आता मंगळवार दिनांक ३० जून २०२६ रोजी सर्व मोर्चे एकत्रित करून एकच विशाल संयुक्त महामोर्चा काढण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

दादर येथील ऐतिहासिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे या संदर्भात सर्व प्रमुख संघटनांची एक महत्त्वपूर्ण समन्वय बैठक पार पडली. या बैठकीला रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती आनंदराज आंबेडकर, भारतीय बौद्ध महासभेचे भीमराव आंबेडकर, ज्येष्ठ नेते ज. वि. पवार, माजी आमदार बाबुराव माने, उपवर्गीकरण विरोधी समितीचे राहुल डंबाळे, प्रतीक कांबळे, संजय भालेराव, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. शांताराम कारंडे तसेच लाँगमार्च आंदोलनाचे नेते व स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे नेते सागर संसारे आणि भिमआर्मी प्रदेशाध्यक्ष अशोक कांबळे जेष्ठ पत्रकार व विचारवंत दिवाकर शेजवाळ, आग्री समाजाचे नेते राजाराम पाटील, रिपब्लिकन नेते दिलीप जगताप, रविंद्र गरुड, दलित पँन्थरचे नेते सुखदेव सोनावणे आणि डॉ. संदेश वाघ यांच्यासह राज्यातील विविध संघटनांचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रमुख भूमिका आणि इशारा: सरकारने आणलेला उपवर्गीकरणाचा प्रस्ताव हा अनुसूचित जातींच्या घटनादत्त हक्कांवर गदा आणणारा आणि समाजात फ ूट पाडणारा आहे. या अन्यायाविरोधात सर्व ५८ जातींचे बांधव आणि आंबेडकरी चळवळीतील सर्व घटक पूर्ण ताकदीने एकत्र आले आहेत. ३० जून रोजी मुंबईत धडकणारा हा संयुक्त महामोर्चा सरकारला हा जनविरोधी निर्णय मागे घेण्यास भाग पाडेल, असा इशारा या बैठकीत उपस्थित नेत्यांनी दिला आहे.

## १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या वाहनांना एचएसआरपी प्लेट बसवण्यासाठी ३० जूनपर्यंत अंतिम मुदत; अन्यथा १ जुलैपासून होणार दंडात्मक कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५० नुसार सर्व वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) बसविणे बंधनकारक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना एचएसआरपी प्लेट बसवण्यासाठी आता ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. या मुदतीनंतर, म्हणजेच १ जुलै २०२६ पासून नियम न पाळणाऱ्या वाहनधारकांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे लातूर प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.


ज्या वाहनधारकांनी आपल्या वाहनांना अद्याप एचएसआरपी प्लेट बसवलेली नाही, अशा वाहनांच्या विविध शासकीय कामांवर परिवहन विभागाने निर्बंध लादले आहेत. त्यानुसार वाहन हस्तांतरण, पत्ता बदल करणे, कर्जबोजा चढविणे किंवा उतरविणे, वाहनांची पुनर्नोंदणी, वाहनात बदल करणे आणि परवाना नूतनीकरण यांसारखी सर्व महत्त्वाची कामे (योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण वगळून) आता पूर्णपणे थांबविण्यात येत आहेत. तसेच १ जुलै २०२६ पासून एचएसआरपी प्लेट नसलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १७७ नुसार थेट दंडात्मक कारवाई केली जाईल.

ज्या वाहनधारकांनी ३० जून २०२६ पर्यंत एचएसआरपी प्लेट बसवण्यासाठी ऑनलाइन किंवा आगाऊ नोंदणी केली आहे, अशा वाहनांना या कारवाईतून तात्पुरती सूट देण्यात येणार आहे. तरी १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या आपल्या वाहनांचे कोणतेही शासकीय काम अडकू नये आणि दंडात्मक कारवाई टाळता यावी, यासाठी अधिकृत फिटमेंट सेंटरकडून लवकरात लवकर एचएसआरपी प्लेट बसविण्याची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन लातूर प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी १३.९ मिलीमीटर पावसाची नोंद

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात २९ जून रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी १३.९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये रेणापूर तालुक्यात सर्वाधिक २९.७ मिलीमीटर, तर देवणी तालुक्यात सर्वात कमी १.२ मिलीमीटर पाऊस झाला आहे.

तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे- लातूर- २१.७, औसा- ६.०, अहमदपूर- १४.४, निलंगा- १.९, उदगीर- १६.२, चाकूर- २१.०, रेणापूर- २९.७, देवणी- १.२, शिरूर अनंतपाळ- १३.३ आणि जळकोट- १५.७ मिलीमीटर.



## मुख्यालयी न राहणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करणार; पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे आश्वासन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील मुख्यालयी वास्तव्यास न राहता घरभाडे भत्ता घेणारे तसेच शासनाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते निजाम दस्तगीर शेख यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

निवेदनात लातूर, रेणापूर, औसा, अहमदपूर, चाकूर, उदगीर, निलंगा, देवणी, जळकोट आणि शिरूर-अनंतपाळ या सर्व तालुक्यांतील गटविकास अधिकारी, ग्रामविकास अधिकारी (ग्रामसेवक), शिक्षक, तलाठी, मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक, आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचारी तसेच इतर शासकीय कर्मचाऱ्यांच्या मुख्यालय निवास, घरभाडे भत्ता आणि बायोमेट्रिक उपस्थितीची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.



मुख्यालयी वास्तव्यास न राहता घरभाडे भत्ता घेतल्याचे आढळल्यास संबंधितांकडून शासनाचे आर्थिक नुकसान वसूल करून त्यांच्यावर विभागीय तसेच कायदेशीर कारवाई करावी. तसेच तक्रारींकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावरही नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

यावेळी पालकमंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी निवेदनाची गांभीर्याने दखल घेत, ''मुख्यालयी न राहणाऱ्या कोणत्याही अधिकारी अथवा कर्मचाऱ्याला पाठीशी घालणार नाही.

जिल्हाधिकाऱ्यांकडून या प्रकरणाची सविस्तर माहिती मागविण्यात येईल. चौकशीत दोषी आढळणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन दिले.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री संजय बनसोडे, लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अरे देवा! १७ वर्षाच्या शिव कॉलेजमध्ये कोसळला, हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. एका १७ वर्षीय विद्यार्थ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अवघ्या १७ वर्षाच्या मुलाला हृदयविकाराला धक्का आल्यामुळे आश्चर्य आणि हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नवी मुंबईतील कोपरखैरणे सेक्टर-५ येथील विवेकानंद म हाविद्यालयात ही घटना घडली. इयत्ता बारावीत शिकणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. मृत विद्यार्थ्याचे नाव शिव पाल असे असून तो पावना येथील रहिवासी होता.

नेहमीप्रमाणे सकाळी तो महाविद्यालयात आला होता. सकाळी साडेसातच्या सुमारास महाविद्यालयाच्या तळमजल्यावर त्याला अचानक हृदयविकाराचा झटका आला आणि तो खाली कोसळला. शिव पाल अचानक कोसळल्यामुळे एकच गोंधळ उडाला. घटनेनंतर म हाविद्यालयातील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी त्याला तातडीने जवळील खासगी रुग्णालयात दाखल केलं. मात्र, तपासणीअंती डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. दरम्यान, मृतदेह पुढील वैद्यकीय तपासणी आणि शवविच्छेदनासाठी वाशी येथील नवी मुंबई महापालिकेच्या रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. या घटनेमुळे महाविद्यालय परिसरात शोककळा पसरली.

## लातूर जिल्ह्यात अनधिकृत होर्डिंग्ज आणि बॅनर्सविरोधात तीव्र मोहीम

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागांत विनापरवाना लावण्यात येणाऱ्या अनधिकृत होर्डिंग्ज, पोस्टर्स आणि बॅनर्स विरोधात जिल्हा प्रशासन, महानगरपालिका व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे तीव्र मोहीम हाती घेतली आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशांचे आणि निर्देशांचे तंतोतंत पालन करण्यासाठी ही कडक पावले उचलण्यात येत असल्याची माहिती अधिकृत प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

गुन्हे दाखल व दंड वसुली

लातूर महानगरपालिका क्षेत्रात विनापरवाना अनधिकृत होर्डिंग लावणाऱ्यांवर प्रशासनाने कायदेशीर बडगा उगारला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात आतापर्यंत १६ एफआयआर दाखल करण्यात आले असून, अनधिकृत बॅनर लावणाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात दंड देखील वसूल करण्यात आला आहे.

प्रिंटिंग एजन्सींना कडक सूचना

महानगरपालिकेची रीतसर परवानगी न घेता कोणत्याही प्रकारचे होर्डिंग किंवा बॅनर छपाई केल्यास संबंधित प्रिंटिंग एजन्सींवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी स्पष्ट नोटीस प्रशासनातर्फे बजावण्यात आली आहे.

माननीय उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका ( १५५) संदर्भात जिल्हा प्रशासन अत्यंत गांभीर्याने काम करत आहे. माननीय जिल्हाधिकारी, लातूर यांनी वेळोवेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक, मनपा आयुक्त, मुख्याधिकारी, आणि राष्ट्रीय महामार्गाचे सहाय्यक अभियंता यांच्या उपस्थितीत आढावा बैठका घेऊन कृती आराखडा निश्चित केला आहे. या संदर्भात मनपा आयुक्त आणि पोलीस अधीक्षक, लातूर यांना वेळोवेळी विविध पत्रांद्वारे उच्च न्यायालयाच्या आदेशांचे काटेकोर पालन करण्याबाबत कळवण्यात आले आहे.

या मोहिमेअंतर्गत लातूर जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या माध्यमातून शहरांमधील मुख्य ठिकाणी नोटीस बोर्ड लावून तसेच वर्तमानपत्रांमध्ये जाहीर आवाहन करून अनधिकृत होर्डिंग संदर्भात मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येत आहे. लातूर जिल्ह्यातील सर्व नागरिक, राजकीय पक्ष, सामाजिक संस्था आणि जाहिरातदारांना प्रशासनातर्फे जाहीर आवाहन करण्यात येते की, कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेवर अनधिकृतपणे होर्डिंग तसेच बॅनर लावू नयेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही फौजदारी व दंडात्मक कारवाई सुरूच राहील.

## सेलू (बु.) येथे १२५ आंब्याच्या रोपांचे मोफत वाटप; रवी वामनराव जाधव यांचा स्तुत्य सामाजिक उपक्रम

**लातूर/प्रतिनिधी :** पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत सामाजिक बांधिलकी जपणारे सामाजिक कार्यकर्ते रवी वामनराव जाधव यांच्या पुढाकाराने सेलू (बु.) ता. लातूर येथे १२५ आंब्याच्या रोपांचे मोफत वाटप करण्यात आले. या उपक्रमाला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून लहान मुले, युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून रोपांचा स्वीकार केला.

शनिवारी गावातील हनुमान मंदिरात रवी वामनराव जाधव यांच्या हस्ते महाआरतीचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आंब्याच्या रोपांचे मोफत वितरण करण्यात आले. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. रवी वामनराव जाधव यांनी यापूर्वीही आपल्या वाढदिवसानिमित्त विविध गावांमध्ये नारळाच्या रोपांचे वाटप करून पर्यावरणपूरक पद्धतीने वाढदिवस साजरा करण्याचा आदर्श निर्माण केला आहे.

वृक्षसंवर्धनासह सामाजिक जाणीवा रुजविण्यासाठी ते सातत्याने विविध उपक्रम राबवत असतात. सामाजिक कार्याची मनापासून आवड असलेले रवी वामनराव जाधव हे गोरगरिबांचे खरे कैवारी म्हणून परिसरात परिचित आहेत. गरजू नागरिकांच्या मदतीसाठी ते नेहमीच तत्पर असतात. त्यांचा मनमिळावू स्वभाव, पारदर्शक कार्यपद्धती आणि समाजाप्रती असलेली तळमळ यामुळे त्यांनी नागरिकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे.

गावासाठी आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून ते सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबवत असून, पर्यावरण संरक्षणाबरोबरच सामाजिक सलोखा आणि जनजागृतीसाठीही ते प्रयत्नशील आहेत. याच कार्यक्रमात सेलू येथील सामाजिक कार्यकर्ते पवन कांबळे सेलुकर यांची उपविभागीय दक्षता समितीच्या सदस्यपदी झालेल्या निवडीबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. रवी वामनराव जाधव यांनी त्यांना गावात निमंत्रित करून शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले तसेच त्यांच्या



पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, युवक, महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पर्यावरण संवर्धनासह समाजहिताची जपणूक करणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

संपादकीय...

## उपवर्गीकरणाविरोधात लातूरची एकजूट; मुंबई मोर्चासाठी मोठा जनसागर रवाना

लातूर जिल्ह्यातील विविध सामाजिक, आंबेडकरी आणि बौद्ध संघटनांनी ३० जून रोजी मुंबई येथे होणाऱ्या उपवर्गीकरणविरोधी राज्यव्यापी मोर्चात सहभागी होण्यासाठी मोठ्या संख्येने प्रस्थान केले आहे. पहाटेपासूनच जिल्ह्यातील विविध भागांतून कार्यकर्ते, पदाधिकारी आणि समाजबांधव बस, चारचाकी वाहने व इतर साधनांनी मुंबईच्या दिशेने रवाना झाले. या प्रवासात मोठा उत्साह आणि एकजुटीचे वातावरण पाहायला मिळाले. या मोर्चात सहभागी होण्यासाठी लातूरमधील विविध संघटनांनी गेल्या काही दिवसांपासून व्यापक जनजागृती मोहीम राबवली होती. गावोगावी बैठका, संवाद आणि संघटनात्मक तयारी करण्यात आली होती. आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे की, अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याचा निर्णय सामाजिक न्यायाच्या मूलभूत तत्त्वांना धक्का देणारा ठरू शकतो. त्यामुळे हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अशी त्यांची ठाम भूमिका आहे. या राज्यव्यापी आंदोलनाचे नेतृत्व रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर करत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली हजारो कार्यकर्ते मुंबईत एकत्र येणार आहेत. भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर यांनीदेखील उपवर्गीकरणाच्या विरोधात ठाम भूमिका घेत राज्यभरातील समाजबांधवांना या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. लातूर जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटनांनी मतभेद बाजूला ठेवत या प्रश्नावर एकसंघ भूमिका घेतल्याचे चित्र दिसून येत आहे. ही एकजूट आंदोलनाचे मोठे वैशिष्ट्य मानली जात आहे. मोर्चासाठी रवाना होताना कार्यकर्त्यांमध्ये संविधान बचाव, सामाजिक न्याय आणि समान हक्कांच्या घोषणा देण्यात आल्या. अनेक ठिकाणी नागरिकांनीही आंदोलनकर्त्यांना शुभेच्छा दिल्या.उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर राज्यातील २७ आमदारांनी विरोधी भूमिका घेतल्याची माहिती समोर आली असून, त्यामुळे या आंदोलनाला राजकीय पाठबळही मिळत असल्याचे बोलले जात आहे. सामाजिक न्यायाच्या प्रश्नावर विविध स्तरांतून सुरू झालेली चर्चा आता राज्यव्यापी आंदोलनाच्या स्वरूपात पुढे येत असल्याचे चित्र दिसत आहे. आंदोलनकर्त्यांच्या मते, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाच्या तत्त्वांनुसार आरक्षणाची अंमलबजावणी झाली पाहिजे आणि त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे विभाजन टाळले पाहिजे. मुंबईतील या मोर्चात राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो समाजबांधव सहभागी होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, प्रशासनाकडूनही आवश्यक तयारी करण्यात आली आहे. लातूर जिल्ह्यातून निघालेल्या कार्यकर्त्यांनी शांततापूर्ण आणि संविधानिक मार्गाने आंदोलन करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. सामाजिक ऐक्य, समानता आणि न्याय या मूल्यांच्या संरक्षणासाठी हा लढा असल्याचे अनेक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या आंदोलनामुळे उपवर्गीकरणाच्या विषयावर राज्य सरकारने सर्व संबंधित घटकांशी व्यापक चर्चा करून निर्णय घ्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. मुंबईतील मोर्चा हा केवळ आंदोलन नसून सामाजिकन्यायाच्या प्रश्नावर समाजाची एकजूट दाखवणारा मोठा लोकशाही उपक्रम ठरणार असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे. लातूरमधून मोठ्या संख्येने समाजबांधव मुंबईकडे रवाना झाल्याने जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीची ताकद आणि संघटनात्मक क्षमता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. आता सर्वांचे लक्ष ३० जून रोजी मुंबई होणाऱ्या या राज्यव्यापी मोर्चाकडे लागले असून, या आंदोलनातून पुढील सामाजिक आणि राजकीय घडामोडींना कोणते वळण मिळते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# हा महाराष्ट्रच नव्हे, तर हा देशही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचाच आहे - गोल्डमॅन डॉ. रोहित पिसाळ

## ▌दैनिक निळे प्रतीकचा १७ वा वर्धापन दिन उत्साहात
## ▌राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कारांनी मान्यवरांचा गौरव






**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी:** निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दैनिक निळे प्रतीकच्या १७ व्या वर्धापन दिनानिमित्त राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवार, दि. २६ जून रोजी मौलाना अबुल कलाम आझाद सभागृह, टीव्ही सेंटर, छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर निळे प्रतीकच्या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. टाळ्यांच्या कडकडाटात झालेल्या या सोहळ्याला सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, साहित्य, प्रशासकीय आणि आंबेडकरी चळवळीतील मान्यवरांची उल्लेखनीय उपस्थिती लाभली.

यावेळी उद्घाटक म्हणून बोलताना गोल्डमॅन डॉ. रोहित पिसाळ म्हणाले, ''हा महाराष्ट्रच नव्हे, तर हा देशही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचाच आहे. देशात अनेक महापुरुष आहेत, आम्ही सर्वांचा सन्मान करतो; परंतु आमचा बाप फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत.'' अशा ठाम आणि कणखर शब्दांत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी अवमानकारक वक्तव्य करणाऱ्यांना चोख प्रत्युत्तर दिले.

डॉ. पिसाळ म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान आणि आरक्षणाच्या माध्यमातून वंचित समाजाला समान हक्क, न्याय आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला. शिक्षण, गुणवत्ता आणि परिश्रम यांच्या बळावर असंख्य तरुण पुढे आले. उपाशी राहून शिक्षण घेतलेल्या, देव-धर्म आणि कर्मकांडाला नाकारून ज्ञानाचा मार्ग स्वीकारलेल्या लोकांनी स्वतःची पात्रता सिद्ध केली. त्यामुळे ''बौद्धांनी आमचे आरक्षण खाल्ले'' असे म्हणणे पूर्णतः चुकीचे असून आरक्षणाचा लाभ मिळविण्यासाठी गुणवत्तेची आणि पात्रतेची कसोटी पार करावी लागते, असे त्यांनी स्पष्ट केले.

समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी व्यक्त करताना ते म्हणाले, ''मी समाजाचे काहीतरी देणे लागतो, या भावनेतून अनेक सामाजिक उपक्रम राबवत आहे. आता आम्ही स्वतःचे विद्यापीठ उभारणार आहोत. गेल्या दहा वर्षांपासून सुमारे ८०० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि निवासाचा खर्च कोणताही गाजावाजा न करता उचलत आहे.'' माता रमाई यांच्या ३९ कोटी रुपयांच्या सोन्याच्या साडीविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, ''तो माझ्या संपत्तीचा दिखावा नव्हता. माता रमाई यांनी अत्यंत हालअपेष्टा सहन केल्या. त्यांच्या त्याग, संघर्ष आणि बलिदानामुळेच आज आम्ही या उंचीवर पोहोचलो आहोत. त्यांचे ऋण आणि योगदान जगासमोर यावे, हीच त्या उपक्रमामागची भावना होती.''

### निळे प्रतीकच्या निर्भीड पत्रकारितेचे कौतुक

संपादक रतनकुमार साळवे यांचा उल्लेख करताना डॉ. रोहित पिसाळ म्हणाले, ''सत्य पत्रकारिता काय असते, हे निळे प्रतीककडून शिकण्याची गरज आहे. माझ्यावर काही लोकांनी बिनबुडाचे आरोप केले तेव्हा रतनकुमार साळवे हे सत्याच्या बाजूने खंबीरपणे उभे राहिले. वृत्तपत्र चालविणे किती कठीण असते, याची मला जाणीव आहे. मात्र त्यांनी तब्बल सतरा वर्षे संघर्ष करून हे कार्य अखंड सुरू ठेवले आहे. हे निश्चितच कौतुकास्पद आहे.''

### निर्भीड पत्रकारिता कायम ठेवा - राजधर दांडगे

कार्यक्रमाचे अध्यक्ष इंजि. राजधर दांडगे यांनी अध्यक्षीय समारोपात सांगितले की, वृत्तपत्र चालविणे ही अत्यंत कठीण जबाबदारी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेच्या परंपरेतून निळे प्रतीक वाटचाल करत आहे. या वृत्तपत्राने कधीही ब्लॅकमेलिंग केली नाही, खंडणी मागितली नाही. समाजातील ज्वलंत प्रश्न ऐरणीवर आणणारी ही निर्भीड पत्रकारिता अशीच सुरू राहावी. आम्ही त्यांच्या पाठीशी सदैव ठामपणे उभे आहोत.

### स्वतःचा मीडिया जगवण्याची गरज राहुल साळवे

क्रांती संघटनेचे राहुल साळवे यांनी आपल्या भाषणात उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, उपवर्गीकरणामुळे समाजाचे मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे सर्वांनी त्याला विरोध केला पाहिजे. ५९ पैकी ५८ जाती या उपवर्गीकरणाच्या विरोधात आहेत. ३० जून रोजी मुंबई येथे होणाऱ्या महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होऊन समाजाची ताकद दाखविण्याची गरज आहे.

निळे प्रतीकचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, ''आपल्या समाजातील नेते भांडवलदारांच्या वृत्तपत्रांना लाखो रुपयांच्या जाहिराती देतात. तीच वृत्तपत्रे आपल्या कार्यकर्त्यांना टाळतात, चळवळीच्या बातम्या दडपतात आणि मनुवादी विचारांचा प्रचार करतात. मग आपणच म्हणतो की, आपला मीडिया नाही. प्रत्यक्षात निळे प्रतीकसारखी वर्तमानपत्रे आपलीच आहेत. ती जगविण्याची जबाबदारी समाजातील प्रत्येकाची आहे.''

### विचारांचे ऐक्य आवश्यक अंबादास रगडे

अंबादास रगडे यांनीही उपवर्गीकरणाला विरोध व्यक्त करत समाजात विचारांचे ऐक्य निर्माण करण्याचे आवाहन केले. समाज दिशाहीन होत असल्याची चिंता व्यक्त करत त्यांनी आपल्या विचारांची प्रभावी मांडणी केली.

### निळे प्रतीकसाठी पाच लाखांची मदत जाहीर

रामेश्वर तायडे यांनी आपल्या ओजस्वी भाषणातून स्वाभिमानी पत्रकारितेची गरज अधोरेखित केली. निळे प्रतीक हे वृत्तपत्र जगले पाहिजे, असे सांगत त्यांनी वृत्तपत्रासाठी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. पुढील पाच वर्षे हे वृत्तपत्र चालविण्याची जबाबदारी आपण स्वीकारत असल्याचेही त्यांनी जाहीर केले. मनुवादी विचारसरणीवर त्यांनी जोरदार प्रहार करत, बाळासाहेब आंबेडकरांचे विचारच राज्य आणि देशाला योग्य दिशा देऊ शकतात, असे मत व्यक्त केले.

### मान्यवरांच्या शुभेच्छा

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बालाजी सोनटक्के, इंजि. भास्कर म्हस्के, पोलीस निरीक्षक अतुल येरमे, डॉ. प्रवीण चाबुकस्वार, मधुकर भोळे यांनीही मनोगत व्यक्त केले. दैनिक निळे प्रतीकच्या निर्भीड आणि प्रामाणिक पत्रकारितेचे कौतुक करत त्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### सतरा वर्षांच्या संघर्षाचा प्रवास

प्रास्ताविकात संपादक तथा निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष रतनकुमार साळवे यांनी सतरा वर्षांच्या संघर्षमय प्रवासाचा भावनिक लेखाजोखा मांडला. वृत्तपत्र चालविताना आलेल्या आर्थिक, सामाजिक आणि विविध प्रकारच्या अडचणी, त्या काळात साथ देणारे सहकारी आणि हितचिंतक यांचा उल्लेख करून त्यांनी सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

''निळे प्रतीक घराघरात पोहोचावे, हे माझे स्वप्न आहे. आपला मीडिया नाही असे म्हणण्यापेक्षा हा आपलाच मीडिया आहे, त्याला सर्वांनी पाठबळ दिले पाहिजे,'' असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

### राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्काराने गौरव

यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दिग्दर्शक,प्रकाश त्रिभुवन, प्राचार्य त्रिंबक कदम, प्रयागताई म्हस्के, डॉ. संगीता अंभोरे, सांडूजी भुजंगे, भवतू सब्ब मंगलम ग्रुप, नगरसेवक अशोक हिवराळे, प्रवीण मोरेश्वर बागडे, शिक्षणमहर्षी मधुकर भोळे (नागपूर), सिद्धार्थ तलवारे (नांदेड), ज्योती लिंबाजी शिनगारे (बुलढाणा), प्रतिमा जुमडे (वाशीम), डॉ. राकेश रामराजे (नाशिक), लक्ष्मण घोरपडे, डॉ. संदीप जाधव, प्रभाकर सोमकुंवर (नागपूर), अब्दुल कयूम अब्दुल रशीद आणि धृपताबाई गायकवाड यांना राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

### मान्यवरांची उपस्थिती

या सोहळ्यास डॉ. धनराज गोंडाने, श्रावणदादा गायकवाड, प्रा. भारत सिरसाट, डॉ. प्रज्ञा साळवे, सी. पी. पाटील, भीमराव मुगदल, डॉ. मधुकर दिवेकर, गंगाताई सुरडकर, उत्तम जाधव, दादाराव साळवे, सुदाम मगर, शाहीर उत्तमराव मस्के, श्रीरंग ससाणे, शांतीलाल दाभाडे, पत्रकार शेख अब्दुल्ला, जगन्नाथ सुपेकर, शारदा पगारे, सुधाकर निसर्ग, बाबूदादा पगारे, विनोद साळवे, कपिल बनकर, पत्रकार बांधव आणि असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रतनकुमार साळवे यांनी केले, तर सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रतीक साळवे यांनी केले. नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने आणि टाळ्यांच्या गजरात संपन्न झालेला हा सोहळा दैनिक निळे प्रतीकच्या सतरा वर्षांच्या संघर्षमय, निर्भीड आणि समाजनिष्ठ पत्रकारितेचा गौरवशाली टप्पा ठरला.

# महाकर्जमुक्तीच्या पलीकडचा विचार

महाराष्ट्राच्या कृषी इतिहासात काही निर्णय हे केवळ प्रशासकीय निर्णय म्हणून नोंदले जात नाहीत, तर ते शासनाच्या व्यापक दृष्टिकोनाचे प्रतीक ठरतात. राज्य शासनाने नुकतीच जाहीर केलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' ही अशाच प्रकारची योजना आहे. ही योजना केवळ कर्जमाफी देणारी योजना नसून शेतकऱ्याला आर्थिक स्थैर्य, नव्याने पतपुरवठा आणि शाश्वत शेतीच्या दिशेने नेणारा एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून पाहिली जात आहे.

२०१४ मध्ये राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषवल्यापासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शाश्वत शेतीचा पुरस्कार केला आहे. महाराष्ट्रातील शेती आजही मोठ्या प्रमाणावर निसर्गावर अवलंबून आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, महापूर, हवामानातील अनिश्चितता आणि उत्पादन खर्चातील वाढ या अनेक कारणांमुळे शेतकरी वारंवार आर्थिक संकटात सापडतो. अशा परिस्थितीत कर्ज हा शेतीचा अविभाज्य भाग बनतो. परंतु जेव्हा हे कर्ज परतफेडीच्या क्षमतेपलीकडे जाते, तेव्हा त्याचे रूप आर्थिक विवंचनेत बदलते. त्यामुळे शेतकऱ्याला दिलासा देण्यासाठी शासनाने यापूर्वीही विविध कर्जमुक्ती योजना राबवल्या होत्या. मात्र या वेळी शासनाने केवळ कर्जमुक्तीचा विचार न करता भविष्यात शेतकरी पुन्हा त्याच परिस्थितीत अडकणार नाही यासाठी व्यापक दृष्टीकोन स्वीकारला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव या योजनेला देण्यात आले आहे, यालाही विशेष महत्त्व आहे. लोककल्याणकारी शासन, जलसंधारण, सिंचन व्यवस्था, ग्रामीण विकास आणि रयतेच्या हिताचा सातत्याने विचार करणाऱ्या अहिल्यादेवींच्या कार्याचा आदर्श आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या योजनेला त्यांचे नाव देऊन शासनाने इतिहासातील लोकाभिमुख परंपरेला अभिवादन केले आहे.

या योजनेचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे तिची रचना. यापूर्वी अनेकदा असे होत असे की दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना कोणताही लाभ मिळत नसे. एखाद्या शेतकऱ्याचे कर्ज दोन लाख दहा हजार रुपये असले तरी तो संपूर्णपणे अपात्र ठरत असे. त्यामुळे अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहत होते. यावेळी शासनाने ही त्रुटी दूर केली आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी




अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती शासनाकडून मिळणार आहे. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना नव्याने कर्ज घेण्याचा आणि शेती उभी करण्याचा मार्ग खुला होणार आहे.

या योजनेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान. अनेकदा चर्चेत केवळ थकीत कर्जदार येतात; मात्र वेळेवर कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन मिळणे आवश्यक असते. ही बाब लक्षात घेऊन शासनाने पन्नास हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. आर्थिक शिस्त राखणाऱ्या आणि प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हा मोठा दिलासा आहे. योजनेचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे एकवेळ समझोता योजना अर्थात वन टाइम सेटलमेंट (ओटीएस). अनेक शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याने ते संपूर्ण कर्जमुक्तीच्या चौकटीत बसत नव्हते. आता अशा शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे तातडीचा आर्थिक भार कमी होऊन त्यांना नियोजनबद्ध पद्धतीने कर्जमुक्तीचा लाभ घेता येणार आहे. मात्र या योजनेचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे तिच्यामागील शासनाची व्यापक भूमिका. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील शासनाने ही बाब स्पष्टपणे मांडली आहे की, वारंवार कर्जमाफी देणे हे अंतिम समाधान नाही. शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात का अडकतो, त्याचे उत्पन्न स्थिर का राहत नाही आणि शेती आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम कशी होईल, याचा अभ्यास करण्यासाठी उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आली होती. त्या समितीच्या शिफारशींमधून शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन सक्षमीकरणाचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

यामध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे तो शाश्वत शेतीचा. प्रत्येक शेतापर्यंत सिंचन सुविधा पोहोचणे, पाण्याचे सक्षम व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेती उत्पादन खर्च कमी करणे, योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि वेळेवर पतपुरवठा करणे या गोष्टींवर शासनाचा भर आहे. कर्जमुक्ती हा त्यातील एक भाग आहे; परंतु भविष्यात कर्जमाफीची गरजच भासू नये अशी परिस्थिती निर्माण करणे हा त्यामागचा मोठा उद्देश आहे.

राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असून जवळपास ३६ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना मानली जात आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करून शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा संदेश दिला आहे.

योजनेची अंमलबजावणीही पूर्णपणे ऑनलाइन आणि पारदर्शक पद्धतीने करण्यात येणार आहे. आधार प्रमाणीकरण, बँकांमधील माहितीची पडताळणी आणि तंत्रज्ञानाधारित प्रक्रिया यामुळे लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे. राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका तसेच प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांमधील कर्जदारांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून साधारणता लाभार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे. पात्र लाभार्थ्यांच्या तपशीलाचे संकलन बँकामार्फत केले जाणार आहे.

आज महाराष्ट्रातील शेतकरी केवळ आर्थिक मदतीची अपेक्षा करत नाही, तर स्थैर्य, विश्वास आणि विकासाची संधी शोधत आहे. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' ही त्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ही योजना शेतकऱ्याच्या तातडीच्या आर्थिक अडचणी दूर करेलच; पण त्याचबरोबर सिंचन, पतपुरवठा, तांत्रिक सक्षमीकरण आणि शाश्वत शेतीच्या माध्यमातून भविष्यातील सक्षम कृषी व्यवस्थेची पायाभरणी करण्याचाही प्रयत्न करेल.

म्हणूनच या निर्णयाकडे केवळ कर्जमाफी म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. हा निर्णय शेतकऱ्याच्या आत्मविश्वासाचे पुनरुज्जीवन, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना आणि शेतीच्या शाश्वत विकासासाठी उचललेले एक धाडसी पाऊल म्हणून पाहिले पाहिजे. महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राला नवसंजीवनी देण्याची क्षमता या योजनेत आहे आणि म्हणूनच ही योजना महाकर्जमुक्तीच्या पलीकडे जाऊन शेतकरी सक्षमीकरणाची नवी दिशा ठरू शकते.

0000

**-प्रवीण टाके, उपसंचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोल्हापूर**

# खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना शिवीगाळ केल्याप्रकरणी केज तालुक्यात तीव्र संताप; खासदारकी रद्द करून गुन्हा दाखल करण्याची मागणी!

## केज तालुका पत्रकार संघाचे नायब तहसीलदारांना निवेदन; कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**केज/प्रतिनिधी** :शिवसेनेचे खासदार संजय दिना पाटील यांनी कर्तव्य बजावणाऱ्या आणि प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांना अत्यंत अश्लील (अर्वाच्य) भाषेत शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेचे तीव्र पडसाद केज तालुक्यात उमटले असून, केज तालुक्यातील सर्व पत्रकारांच्या वतीने खासदार संजय दिना पाटील यांचा जाहीर निषेध करण्यात आला आहे.

याप्रकरणी खासदारांवर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत तात्काळ गुन्हा दाखल करावा व त्यांची खासदारकी कायमस्वरूपी रद्द करण्यात यावी, या मागणीसाठी केज तालुका पत्रकार संघाच्या वतीने नायब तहसीलदार हांगे साहेब यांना निवेदन देण्यात आले. तहसील परिसर घोषणांनी दणाणला निवेदन देण्यासाठी तालुक्यातील पत्रकार मोठ्या संख्येने एकत्र आले होते. यावेळी उपस्थित पत्रकारांनी खासदारांच्या दडपशाही आणि अरेरावीविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पत्रकारांच्या घोषणांनी संपूर्ण तहसील कार्यालय परिसर दणाणून गेला होता. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेवर अशा प्रकारे हल्ला करणाऱ्या लोकप्रतिनिधीचा सर्वच स्तरांतून धिक्कार केला जात आहे. तीव्र आंदोलनाचा इशारा पत्रकार बांधवांनी लेखी निवेदनाद्वारे प्रशासनाला दिला आहे.

पत्रकार संघाने निवेदनात म्हटले आहे की, लोकशाहीत प्रश्न विचारणे हा पत्रकारांचा अधिकार आहे. मात्र, खासदार संजय दिना पाटील यांनी ज्या प्रकारे पत्रकारांना धमकावले आहे, ते अत्यंत निंदनीय आहे. प्रशासनाने यावर तात्काळ कठोर कार्यवाही करावी. जर या प्रकरणी तात्काळ योग्य ती पावले उचलली गेली नाहीत, तर केज तालुक्यातील सर्व पत्रकार रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या निवेदनाच्या प्रतिलिपी पुढील योग्य कार्यवाहीसाठी मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री आणि मा. जिल्हाधिकारी (बीड) यांना देखील पाठवण्यात आल्या आहेत.

तालुक्यातील सर्व पत्रकार संघाचे प्रतिनिधी म्हणून पत्रकार उपस्थित होते. या निवेदनावर प्रकाश मुंडे, गौतम बचुटे, श्रावण कुमार जाधव, विजय आरकडे, तात्या गवळी, महादेव गायकवाड, संतोष गालफाडे, रामदास साबळे, हनुमंतराव सौदागर, वसंत सोनवणे, दिनकर जाधव, अशोक सोनवणे,



चंद्रकांत पाटील, रणजीत तात्याराम घाडगे, प्रदीप गायकवाड,अजय भांगे आणि पांडुरंग कसबे यांच्या सह्या आहेत. निवेदन स्वीकारताना नायब तहसीलदार हांगे साहेब यांच्यासोबत एलसीबी विभागाचे शिवाजी कागदे साहेब देखील उपस्थित होते. या घटनेमुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात पत्रकारांमध्ये आणि नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांची खोटी सही करून बनावट आदेश काढणाऱ्या नगरसेवकाला मध्यरात्री अटक; पत्नी भाजपात, स्वत: होता स्वीकृत!

**गडचिरोली/प्रतिनिधी** : जिल्हाधिकाऱ्यांच्या बनावट लेटरहेडवर हुबेहूब स्वाक्षरी करून तब्बल चार कोटी रुपयांच्या विकासकामांसाठी बनावट प्रशासकीय मान्यता (प्रमा) आदेश तयार केल्याच्या गंभीर प्रकरणात पोलिसांनी पहिली मोठी कारवाई करत प्रमुख संशयित आशिष पिपरे याला रविवारी मध्यरात्री छत्रपती संभाजीनगर येथून अटक केली. गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या तपासानंतर झालेल्या या कारवाईमुळे जिल्ह्याच्या प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. अटक करण्यात आलेला आशिष पिपरे हा चामोर्शी नगरपंचायतीतील स्वीकृत नगरसेवक असून त्याची पत्नी भाजपची नगरसेविका आहे. विशेष म्हणजे, पिपरेची तीन महिन्यांपूर्वी भाजपमधून हकालपट्टी करण्यात आली होती. असे जिल्हाध्यक्षांचे म्हणणे आहे. भाजपमध्ये असताना त्याने काँग्रेसच्या गटातून स्वीकृत नगरसेवक पद मिळविले होते. सत्तापक्षातील काही नेत्यांशी त्याची जवळीक आहे. यापूर्वी अगरबत्ती प्रकल्पाच्या नावाखाली शेकडो महिलांची फसवणूक केल्याचे आरोपही चामोर्शीतील काही महिलांनी त्याच्यावर केले होते.

या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत अनेक महत्त्वाच्या साक्षीदारांचे जबाब नोंदविले आहेत. मोबाईल कॉल डिटेल्स, आर्थिक व्यवहार, डिजिटल पुरावे तसेच बनावट कागदपत्रांच्या निर्मितीमागील संपूर्ण साखळीचा बारकाईने मागोवा घेतला जात आहे. पिपरेकडून होणाऱ्या चौकशीतून या कटात सहभागी असलेल्या इतर व्यक्तींचीही नावे पुढे येण्याची शक्यता असून, आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, आशिष पिपरे याने एका माजी राज्यमंत्र्याचा स्वीय सहाय्यक (पीए) म्हणूनही काम केले होते. या राजकीय जवळीकचा फायदा घेत जिल्हा खनिज प्रतिष्ठान (डीएमएफ) निधीतील विकासकामांसाठी बनावट प्रशासकीय मान्यता आदेश तयार करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पिपरेच्या अटकेनंतर तपासाला अधिक वेग आला असून, बनावट लेटरहेड, जिल्हाधिकाऱ्यांची स्वाक्षरी, प्रशासकीय मंजुरी आदेशांची निर्मिती, त्यांचा वापर आणि त्यामागील आर्थिक व्यवहारांचा सखोल तपास सुरू आहे. या कटात आणखी काही व्यक्तींचा सहभाग असल्याचा संशय असून, विविध धागेदोरे जोडण्याचे काम तपास यंत्रणा करत आहे.

धक्कादायक बाबी समोर येणार

विशेष म्हणजे, यापूर्वीही अशाच पद्धतीने काही विकासकामांसाठी बनावट प्रशासकीय मान्यता आदेश तयार करून त्याचा वापर करण्यात आल्याचा संशय व्यक्त होत आहे. या सर्व व्यवहारांची चौकशी पोलिसांकडून सुरू असून, तपासातून आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे हे प्रकरण केवळ एका बनावट 'प्रमा'पुरते मर्यादित नसून, त्यामागे मोठे रॅकेट कार्यरत होते का, याचाही तपास सुरू आहे.

कटात नेमके किती जण सहभागी?

जिल्हाधिकाऱ्यांसारख्या सर्वोच्च प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नावाचा आणि स्वाक्षरीचा गैरवापर करून शासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाल्याने या प्रकरणाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. पहिल्या अटकेनंतर तपासाला निर्णायक गती मिळाली असली, तरी या कटात नेमके किती जण सहभागी होते, बनावट कागदपत्रांचे जाळे किती व्यापक आहे आणि या माध्यमातून शासनाची किती मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाली, याचा उलगडा होणे आता महत्त्वाचे ठरणार आहे. पोलिसांच्या पुढील तपासातून या प्रकरणातील अनेक धक्कादायक खुलासे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# ठाण्यात बुधवारी २४ तास पाणीपुरवठा बंद; या भागांवर सर्वाधिक परिणाम

**ठाणे/प्रतिनिधी** : यंदा पाऊस लांबल्याने धरण क्षेत्रातील पाणी साठ्याचे नियोजन करण्यासाठी लागू केलेल्या कपातीमुळे कळवा, मुंब्रा, दिवा भागाचा पाणी पुरवठा गेल्या आठवड्यात ४८ तास बंद ठेवण्यात आला असतानाच, त्यापाठोपाठ स्टेम प्राधिकरणाकडून ठाणे शहराला होणारा पाणी पुरवठा बुधवारी २४ तासांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. या बंदच्या काळात टंचाईच्या झळा कमी करण्यासाठी पालिकेच्या योजनेचा पाणी पुरवठा विभागवार टप्प्याटप्प्याने सुरू ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

ठाणे महापालिका क्षेत्राला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई महापालिका, स्टेम प्राधिकरण आणि ठाणे महापालिकेची स्वत:ची योजना या चार स्त्रोतांमार्फत पाणी पुरवठा करण्यात येतो. यंदा पाऊस लांबल्याने धरण क्षेत्रातील पाणी साठ्याचे नियोजन करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कपात लागू केली असून त्यापाठोपाठ आता स्टेम प्राधिकरणानेही कपात लागू केली आहे. कळवा येथील पाटबंधारे विभागाच्या निर्देशानुसार ही कपात लागू करण्यात आली आहे.

ठाणे शहराला स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा बुधवार १जुलै रोजी सकाळी ९ ते गुरुवार २ जुलै रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत असा २४ तासांसाठी बंद राहणार आहे. या बंदच्या काळात टंचाईच्या झळा कमी करण्यासाठी ठाणे महापालिकेच्या स्वत:च्या पाणी पुरवठा योजनेचे नियोजन करुन टप्प्याटप्प्याने ठाणे शहरात एक वेळ पाणी पुरवठा सुरू ठेवण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

# नसरापूर प्रकरणात न्याय मिळाला, मुख्यमंत्र्यांचे कौतुक; आता संतोष देशमुख प्रकरणी तोच नियम लावा, मनोज जरांगेंची भूमिका

**बीड/प्रतिनिधी** : नसरापूर अत्याचार हत्या प्रकरणातील आरोपीला पुणे न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली आहे. घटनेच्या अवघ्या दोनच महिन्यात न्यायालयाने निकाल देत आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली आहे. या निकालावरुन मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं कौतुक केलं आहे. असाच न्याय संतोष देशमुख प्रकरणात देण्याची विनंतीही जरांगे पाटील यांनी केली.

मुख्यमंत्री साहेबांचे कौतुक केले पाहिजे. तत्परता दाखवली आणि दोन महिन्यांत आरोपीला शिक्षा सुनावली. असाच नियम संतोष देशमुख प्रकरणात लावायला पाहिजे. मालेगाव येथील ३ वर्षीय मुलीच्या प्रकरणात देखील हेच केलं पाहिजे. फाशीची शिक्षा झाल्याने नसरापूरच्या कुटुंबाला आणि महाराष्ट्रातील जनतेला न्याय मिळाला. पण, संतोष देशमुख, महादेव मुंडे, मालेगाव या प्रकरणात देखील तोच नियम लावायला पाहिजे,'' अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली.

बीडमधील विलास घुले हत्या प्रकरण हा खुप अवघड आणि सिरीयस विषय आहे. यामध्ये आता मुख्यमंत्री साहेबांनी लक्ष घातलं पाहिजे. परळी पॅटर्न राबवून खोटे गुन्हे दाखल झाले का? याची संपूर्ण माहिती घेणार आहे. एघ्ऊ ने याच्या मुळाशी गेलं पाहिजे आणि सर्वबाजूने चौकशी केली पाहिजे. घुले बंधूंना आणि कुटुंबाला न्याय मिळालाच पाहिजे. या प्रकरणाच्या मुळाशी जावून तपास करायला लावणार, त्याशिवाय शांत बसणार नाही. एसआयटी खोटा तपास करणार नाही. खासदार बजरंग बप्पाच्या मुलाचं नाव घेतलं जात आहे. एसआयटी ने तपास केला असून, त्यात काही आढळून आलेलं नाही. बजरंग बप्पाचा मुलगा दोषी असेल तर खऱ्याचं खरं होईल,'' अशी प्रतिक्रिया देत मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधला.

महादेव मुंडे हत्या प्रकरणाचा पुन्हा तपास करावा, अशी मागणी चार महिन्यांपूर्वीच केली होती. महादेव मुंडे प्रकरणाचा तपासही मुळापर्यंत होणार. यातले आरोपी शंभर टक्के दिसतील. लवकरच एघ्ऊ आणि ण्घ् चा तपास सुरू होणार आहे. सत्तेची पॉवर आणि दबाव यामुळं खोटे गुन्हे सर्रास दाखल केले आहेत. पण, आता ते दिवस राहिलेले नाहीत. माझ्या नादी लागायचं बंद करा आणि काड्या करायचं पण बंद करा. माझ्या कचाट्यात आले तर सुट्टी नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांना दिला.

# करासवाड्यात थरार! कोकणातील कुटुंबाचा गोव्यात गूढ मृत्यू

## वडील अन् मुलाची बॉडी आढळली, आता आईनेही सोडला जीव

**मुंबई/प्रतिनिधी** : रासवाडा-म्हापसा येथील साईनगर परिसरातून एक अत्यंत धक्कादायक बातमी समोर आली आहे. एका भाड्याच्या खोलीत सावंतवाडी तालुक्यातील सोनुर्ली येथील रहिवासी असलेल्या पिता-पुत्राचा संशयास्पद स्थितीत मृत्यू झाल्यानंतर, आता गोमेकॉ रुग्णालयात मृत्यूशी झुंज देणाऱ्या त्यांच्या पत्नीचाही दुर्दैवी मृत्यू झाला आहे. अवघ्या चार दिवसांत हसते-खेळते संपूर्ण जाधव कुटुंब उद्ध्वस्त झाल्याने सावंतवाडी आणि गोव्यात प्रचंड खळबळ उडाली असून या रहस्यमयी मृत्यूचे कोडे सोडवण्याचे मोठे आव्हान आता म्हापसा पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, हे कुटुंब मूळचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील सोनुर्ली गावचे होते. गेल्या वर्षभरापासून अजय जाधव (पती) हे कामानिमित्त कुटुंबासह गोव्यात स्थायिक झाले होते. ते पणजी येथील एका खाजगी बँकेत नोकरीला होते. करासवाडा येथील साईनगर भागात एका भाड्याच्या खोलीत ते आपली पत्नी सुवर्णा आणि ७ वर्षांचा मुलगा अथर्व याच्यासह राहत होते. सुवर्णा या गृहिणी होत्या, तर चिमुरडा अथर्व स्थानिक शाळेत शिक्षण घेत होता.

या घटनेची पार्श्वभूमी अत्यंत रहस्यमय आहे. शुक्रवारी रात्री अजय जाधव यांनी सोनुर्ली येथे राहणाऱ्या आपल्या वडिलांशी फोनवर नेहमीप्रमाणे संवाद साधला होता. मात्र, शनिवार सकाळपासून अजय यांच्या मोबाईलवर संपर्क होऊ शकला नाही. नातेवाईकांनी वारंवार फोन करूनही पलीकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने वडिलांनी थेट सोनुर्लीहून गोव्यातील करासवाडा गाठले.

अजय यांच्या वडिलांनी खोलीत जाऊन पाहिले असता समोरील दृश्य पाहून त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. अजय आणि नातू अथर्व हे दोघेही खोलीत निपचित अवस्थेत पडले होते, तर सुवर्णा या गंभीर अवस्थेत विव्हळत होत्या. त्यांनी तातडीने रुग्णवाहिका आणि स्थानिक डॉक्टरांना बोलावले. डॉक्टरांनी तपासणी केली असता अजय आणि ७ वर्षांचा अथर्व या बाप-लेकाचा आधीच मृत्यू झाला असल्याचे स्पष्ट झाले.

शनिवारी सुवर्णा जाधव यांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने त्यांना तातडीने पुढील उपचारासाठी बांबोळी येथील 'गोमेकॉ' (गोवा मेडिकल कॉलेज) रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, मृत्यूशी सुरू असलेली त्यांची झुंज अखेर अपयशी ठरली आणि मंगळवारी दुपारी सुवर्णा यांचेही उपचार सुरू असताना निधन झाले.

कुटुंबावर दु:खाचा डोंगर

दरम्यान, रविवारी दुपारी अजय आणि चिमुकल्या अथर्व या बाप-लेकाच्या मृतदेहावर सोनुर्ली येथील जाधववाडीत अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले होते. संपूर्ण गाव या दु:खद घटनेने सुन्न झाले असतानाच आता सुवर्णा यांच्याही निधनाची बातमी आल्याने जाधव कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

# भर पावसामध्ये गटनेते हारूणभाई इनामदार यांनी शहरातील विविध भागांची केली पाहणी

## नगर पंचायतच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना नाले व गटारींची नियमित स्वच्छता करण्याच्या दिल्या

**केज/प्रतिनिधी** : केज शहरात सुरू असलेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा गट नेते हारूणभाई इनामदार यांनी भर पावसात शहरातील विविध भागांची पाहणी केली. यावेळी त्यांनी रस्ते, नाले, गटारी तसेच स्वच्छतेच्या कामांचा आढावा घेत नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या.

पाहणीदरम्यान हारूणभाई इनामदार यांनी नगर पंचायतच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना नाले व गटारींची नियमित स्वच्छता करण्याच्या सूचना दिल्या. पावसाचे पाणी साचणार नाही, नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही आणि स्वच्छतेची कामे वेळेत पूर्ण होतील, याची काळजी घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने काम करावे, तसेच शहरातील व्यापारी व नागरिकांनीही स्वच्छता राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन हारूणभाई इनामदार यांनी केले.

भर पावसात शहराची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांनी नागरिकांच्या समस्यांकडे लक्ष वेधले. स्वतः ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी भर पावसात शहरातील विविध भागात जाऊन



पाहणी करून व्यापारी व नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन व्यापाऱ्यांच्या व नागरिकांच्या समस्या सोडविण्याचे कर्मचाऱ्यांना सूचना दिल्याबद्दल नागरिकांतून त्यांचे समाधान व्यक्त केले जात आहे.

यावेळी ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार, मुकादम भीमा शिंदे, आसेफ इनामदार, पठाण साहेब, मुफसील शेख, सज्जाद इनामदार, बापू कापरे यांच्यासह नगरपंचायत चे कर्मचारी आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# केजमध्ये माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या स्वागताला वरुण राजाची हजेरी!

## कार्यकर्ते आणि शिवसैनिकांचा उत्साह शिगेला; भर पावसात ठाकरेंना पाहण्यासाठी केज शहरात जनतेची तोबा गर्दी!







**केज/प्रतिनिधी** : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख मा.उद्धवजी ठाकरे व माजी मंत्री आमदार आदित्य ठाकरे भर पावसात केज वासियांच्या भेटीला आले होते.यावेळी जणू वरुण राजा ठाकरे परिवारांच्या स्वागतासाठी आला आहे. असे भासत होते. त्यांचे आगमन होण्यापूर्वीच शहरात पाऊस सुरू झाला होता. पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे हे केज शहरात येणार असल्याने त्यांच्या स्वागताची शिवसेनेचे नेते रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केज तालुका शिवसेनेच्या वतीने जयत्त तयारी करण्यात आली होती.

शिवसेनेचे खासदार फुटीच्या नाट्यमय घडामोडी घडल्यानंतर प्रथमच पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे हे केज शहरात येत असल्याने शिवसैनिकांच्या वतीने त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली होती.भर पावसामध्ये शिवसैनिकांचा उत्साह शिगेला पोहचला होता.

शिवसेना प्रमुख उद्धवजी ठाकरे यांची परभणी येथे सभा होती.

परभणी येथील कार्यक्रमानंतर शिवसेनाप्रमुख उद्धवजी ठाकरे व माजी मंत्री आमदार आदित्य ठाकरे यांच्या समवेत शिवसेना नेते संजय राऊत, शिवसेना सचिव अनिल देसाई, मिलिंदजी नार्वेकर, विरोधी पक्ष नेते अंबादासजी दानवे, शिवसेना नेत्या सुषमाताई अंधारे, परशुरामजी जाधव यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी हे परळी, आंबेजोगाई मार्गे केज येथून धाराशिव कडे जाताना शहरातील श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवसेना नेते रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाप्रमुख अशोक जाधव व त्यांच्या सहकारी शिवसैनिकांनी पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या स्वागताची जय्यत तयारी केली होती. भर पावसामध्ये पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांनी शिवसैनिकांचा सन्मान स्विकारुन पुढे धाराशिव येथील कार्यक्रमासाठी कळंबच्या दिशेने रवाना झाले.

## नसरापूर अत्याचारातील नराधमाला मरेपर्यंत फाशीची शिक्षा; ६० दिवसांत ऐतिहासिक निकाल

**पुणे/प्रतिनिधी :** भोर तालुक्यातील नसरापूर येथील साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर महाराष्ट्र दिनी लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आल्याच्या प्रकरणात न्यायालयानं आरोपी भीमराव प्रभाकर कांबळेला (वय ६५) मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली. या प्रकरणाचा तपास ६० दिवसांत पूर्ण करून न्यायालयानं निकाल दिला. जलदगतीने सुनावणी पूर्ण झालेलं नसरापूर अत्याचार प्रकरण हा पहिला खटला ठरला आहे. या संदर्भात सरकारी वकील ॲड. अजय मिसर आणि पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांनी पत्रकार परिषद घेऊन खटल्याची सविस्तर माहिती दिली.



आरोपीने रचला होता कट : सरकारी वकील ॲड. अजय मिसर यांनी सांगितलं की, न्यायालयानं १३७ पानी निकालपत्राचं वाचन केलं. अवघ्या १६ न्यायालयीन कामकाजाच्या दिवसांत सरकारी पक्षाने ५५ साक्षीदारांची तपासणी पूर्ण केली. आरोपीने गुन्ह्याचा नियोजनपूर्वक कट रचल्याचं तपासातून स्पष्ट झालं. घटनेपूर्वी आरोपी भिमराव कांबळे काही दिवस पीडितेच्या गावात राहिला होता. पीडित मुलगी तिच्या आजीसोबत राहत असल्याची खात्री करून त्यानं घटनास्थळाची व्यवस्थित रेकी केली. तसंच तिथं आपलं सामान ठेवलं आणि काही दिवस तिथं वास्तव्य केलं.

चिमुरडीच्या शरीरावर तब्बल १८ गंभीर जखमा : घटनेच्या दिवशी आरोपीनं अत्यंत थंड डोक्यानं चिमुरडीला गाईचं वासरू दाखवतो असं सांगितलं आणि गाठीशेव खाण्याचं आमिष दाखवून तिला ठरवलेल्या निर्जन घटनास्थळाकडं घेऊन गेला. दुपारी ३ वाजून १२ मिनिटांनी आरोपी भिमराव कांबळे पीडितेला घेऊन जाताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला. दुपारी ३ वाजून ५१ मिनिटांनी तो त्याच ठिकाणाहून एकटाच बाहेर पडताना दिसला. या एकूण ३९ मिनिटांच्या कालावधीत त्यानं चिमुरडीवर अमानुष अत्याचार केला. शवविच्छेदन आणि वैद्यकीय अहवालानुसार या ३९ मिनिटांत चिमुरडीच्या शरीरावर तब्बल १८ गंभीर जखमा आढळून आल्या आहेत. चिमुरडीचा मृत्यू झाल्यानंतरही नराधम भिमराव कांबळेनं तिच्या मृतदेहाशी अनैतिक संबंध केला आणि मृतदेहावर अत्याचार केल्याचं सरकारी वकील ॲड. अजय मिसर यांनी सांगितलं.

आरोपीवर यापूर्वी दोन गंभीर गुन्हे : ते पुढे म्हणाले की, ६५ वर्षीय भिमराव कांबळेवर यापूर्वी दोन गंभीर गुन्हे दाखल होते. जेव्हा आरोपीचं वय ३८ वर्षे होतं, तेव्हा त्यानं एका ६५ वर्षांच्या वृद्ध महिलेवर लैंगिक अत्याचार केला होता. मात्र, पूर्वीच्या दोन्ही गुन्ह्यांतून पुराव्याअभावी त्याची निर्दोष मुक्तता झाली होती. यामुळं त्याची हिंमत अधिकच बळावली आणि त्यानं वयाच्या ६५व्या वर्षी हा तिसरा अत्यंत भयंकर गुन्हा केला. या घटनेत पोलिसांनी न्यायालयासमोर १५ दिवसात तब्बल १२०० पानांचं सविस्तर दोषारोपपत्र दाखल केलं. यामध्ये लास्ट सीन टुगेदर थिअरी, वैज्ञानिक पुरावे, वैद्यकीय पुरावे, एफएसएल रिपोर्ट आणि डीएनए प्रोफाईलिंग यांसारख्या ठोस पुराव्यांचा समावेश होता आणि आरोपीविरुद्ध दोषनिश्चिती करण्यात आली. यानंतर न्यायालयासमोर प्रत्यक्ष खटल्याच्या सुनावणीला सुरुवात झाली आणि अवघ्या १६ वर्किंग डेजमध्ये सरकारी पक्षातर्फे तब्बल ५५ साक्षीदार तपासण्यात आले.

आरोपीला फाशीची शिक्षा : आज १३७ पानांच्या निकालपत्राचं वाचन करताना न्यायालयानं आरोपीच्या बचावाचे सर्व मार्ग खोडून काढले. आरोपीचं वय ६५ वर्षे आहे ही एकच बाब त्याच्या शिक्षेत सूट मिळवण्यासाठी मांडली जाऊ शकत होती. परंतु, न्यायालयानं स्पष्ट केलं की, वयाच्या ६५व्या वर्षीही या नराधमाची विकृत वासना आणि भूक शमलेली नाही. अशा व्यक्तीला जन्मठेपेची शिक्षा देऊन जिवंत ठेवणं किंवा समाजात मोकळं सोडणं समाज सुरक्षिततेसाठी अत्यंत घातक ठरेल. जे पुरावे न्यायालयात सादर करण्यात आले या सर्व बाबी आणि सर्वोच्च न्यायालयाच्या १२ महत्त्वपूर्ण न्यायनिवाड्यांचा दाखला विचारात घेऊन, न्यायालयानं नराधम भिमराव कांबळेला एकूण तीन वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये मृत्युदंडाची (फाशीची) शिक्षा सुनावली. या ऐतिहासिक निकालामुळं चिमुरडीच्या कुटुंबाला अखेर न्याय मिळाला, असं सरकारी वकील ॲड. अजय मिसर यांनी सांगितलं.

## मासे प्रेमींना राज्य सरकारचा धक्का! मासेमारीवरील बंदी कायम

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील मत्स्यसाठ्याचे संवर्धन, माशांना प्रजननासाठी अधिक कालावधी उपलब्ध करून देणे, तसेच पावसाळ्यातील खराब हवामानामुळे मच्छीमारांची जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी राज्य शासनाने पावसाळी मासेमारी बंदीचा कालावधी वाढवून आणखी वाढविण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी विधानसभेत दिली.

यापूर्वी राज्याच्या जलधी क्षेत्रात १ जून ते ३१ जुलै या ६१ दिवसांच्या कालावधीत यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौकांना बंदी होती. पश्चिम मान्सूनचे आगमन, मत्स्यसाठ्याचे संरक्षण आणि मच्छीमारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा कालावधी निश्चित करण्यात आला होता. मात्र, मासेमारी हंगामाच्या सुरुवातीला लहान माशांची होणारी मासेमारी रोखण्यासाठी बंदीचा कालावधी १५ ऑगस्टपर्यंत वाढवावा, अशी मागणी विविध मच्छीमार सहकारी संस्थांकडून शासनाकडे करण्यात आली होती. या मागणीच्या अनुषंगाने जिल्हा समिती तसेच राज्य सल्लागार व सनियंत्रण समितीचे अहवाल मागविण्यात आले. या समित्यांनीही बंदीचा कालावधी १५ ऑगस्टपर्यंत वाढविण्याचा अभिप्राय दिला. शासनाच्या मते, वाढीव बंदीमुळे मत्स्यसाठ्याचे जतन व संवर्धन होण्यास मदत होईल. तसेच माशांना प्रजननासाठी पुरेसा कालावधी मिळेल आणि भविष्यातील पिढ्यांसाठी मत्स्यसंपदा टिकवून ठेवणे शक्य होईल. याशिवाय पावसाळ्याच्या सुरुवातीला येणारे वादळी वारे, चक्रीवादळे, अवकाळी पाऊस आणि खराब हवामानामुळे होणारी संभाव्य जीवित व वित्तहानीही टाळता येणार आहे.

# वारकऱ्यांच्या चरण सेवेला प्रारंभ

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची उपक्रम

**मुंबई/प्रतिनिधी :** आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे पायी मार्गस्थ होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे चरण सेवा उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध आरोग्य संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांच्या चरणसेवेला प्रारंभ झाला आहे. त्यात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार आणि आरोग्य जनजागृतीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.




**चरण सेवेकरिता समन्वय**

वारकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या चरण सेवा उपक्रमात सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या ११ प्रमुख जिल्ह्यांचा समावेश आहे. पालखी मार्गावरील सुमारे ४०० विश्रांती व मुक्काम स्थळी वारकऱ्यांसाठी चरण सेवा, वैद्यकीय तपासणी, प्राथमिक उपचार तसेच आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयातून १२ हजारांहून अधिक प्रशिक्षित डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय व फिजिओथेरपीचे विद्यार्थी तसेच स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत असतील.

**३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाद्वारे मालिश**

आषाढी वारीदरम्यान दररोज अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायांवर मोठा ताण येतो. पायांना सूज, वेदना, फोड, स्नायूंचा ताण व थकवा यांसारख्या समस्यांवर तात्काळ उपाययोजना उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी प्रशिक्षित वैद्यकीय पथके व स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत.

या उपक्रमांतर्गत औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी सुमारे ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाची व्यवस्था करण्यात आली असून, गरजेनुसार पालखी मार्गावर रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.

**८ आरोग्य रथाद्वारे जनजागृती**

चरण सेवेसोबतच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैलीचा संदेश तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून पालखी मार्गावरील वारकरी आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. तसेच, वारकऱ्यांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी पालखी मार्गावरील निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे.

गतवर्षी राबविण्यात आलेल्या चरण सेवा उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या उपक्रमाद्वारे सुमारे १ लाख ७५ हजार वारकऱ्यांना थेट चरण सेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला होता. यंदाही अधिकाधिक वारकऱ्यांपर्यंत चरण सेवा, वैद्यकीय सुविधा आणि आरोग्य जनजागृती प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

**भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची**

भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची या संकल्पनेवर आधारित चरण सेवा हा उपक्रम वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देणारा अभिनव उपक्रम आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकारातून जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे वारकऱ्यांचा पायी प्रवास अधिक सुरक्षित, सुदृढ आणि सुखकर होण्यास मोठी मदत होणार आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख तसेच पालखी मार्गावरील नागरिकांना चरणसेवा आणि आरोग्य जनजागृती उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

**चरणसेवा म्हणजे काय?**

संत तुकाराम महाराजांनी ''तुज मागणें तें देवा, आम्हां तुझी चरण सेवा'' या अभंगातून चरण सेवेचे महत्व अधोरेखित केले आहे. त्याच सेवाभावातून प्रेरणा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून चरण सेवा उपक्रम गेल्या वर्षीपासून सुरू करण्यात आला आहे. यंदा या उपक्रमाचे दुसरे वर्ष आहे.

आषाढी वारीत अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायावर मोठा ताण येत असल्याने त्यांना औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, आधुनिक मसाज उपकरणांच्या साहाय्याने स्नायूंना आराम, सूज, वेदना व फोडांवर प्राथमिक उपचार तसेच आवश्यकतेनुसार वैद्यकीय तपासणी व पुढील उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देत सेवाभावातून आधार देणारी हीच चरणसेवा होय. संत तुकाराम महाराजांच्या सेवाभावाच्या विचारांना आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देत वारकरी परंपरा आणि लोकसेवेचा सुंदर संगम या उपक्रमातून घडविण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वातून आणि सेवाभावी दृष्टिकोनातून 'चरण सेवा उपक्रम साकार झाला आहे. वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देणारा हा एक अभिनव उपक्रम असून, आषाढी वारीत लाखो वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देतानाच त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न या माध्यमातून होत आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा मानत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष विविध संस्थांच्या समन्वयातून यंदाही ही चरण सेवा अधिक व्यापक स्वरूपात वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास सज्ज असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

# रिलेशानी कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी :** ''सध्याच्या काळात किशोरवयीन मुलांच्या मानसिक तणावात वाढ होत आहे, पालकांमध्ये आपल्या मुलांच्या वर्तनाबद्दल ताण वाढत आहे. शिक्षकांनाही विद्यार्थ्यांच्या वर्तनाबाबत चिंता वाटत आहे. या साऱ्यावरचा सर्वात प्रभावी उपाय म्हणजे मनमोकळा संवाद साधणे. खुल्या मनाने साधलेल्या संवादामुळेच नातेसंबंध सुदृढ होण्यास मदत होणार आहे, असे विचार रिलेशानी कार्यशाळेत मांडण्यात आले.

येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालयात नंदकिशोर भार्गव शिक्षण अभियान अंतर्गत पुण्याच्या आरोग्यभान संस्थेच्यावतीने विद्यालयातील सर्व शिक्षक,शिक्षकांसाठी दोन दिवसीय रिलेशानी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यासोबतच पालकांसाठी एक सत्र व विद्यार्थ्यांसाठी एक सत्र घेण्यात आले.

आरोग्यभान संस्था गेल्या ३१ वर्षापासून शहर, खेड्यापाड्यात, आदिवासी भागात लोकांशी आरोग्य संवाद साधत असते. या संस्थेचा आणखीन एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे रिलेशानी शिबीर. रिलेशानी म्हणजे सुंदर, समृध्द, सुरक्षित शानदार नातेसंबंध. वयात आलेल्या मुलांना आपल्या शरीरातील बदलाबद्दल, मैत्री, प्रेम, आकर्षण याबाबत असंख्य प्रश्न निर्माण झालेले असतात. या प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या प्रयत्नान बऱ्याचदा या मुलांची दिशा भरकटत जाते, मनाचा प्रचंड गोंधळ होतो हा गोंधळ अतिशय संवेदनशिलतेने हाताळण्याची गरज असते. त्याचे महत्त्वाचे माध्यम म्हणजे संवाद. मुलांशी मोकळ्यामनाने संवाद साधला तर त्यांच्या मनातील ताण कमी होण्यास मदत होईल. पालक-पाल्य, शिक्षक - विद्यार्थी यांच्यात एक सुंदर नाते निर्माण होईल हा विश्वास या कार्यशाळेत व्यक्त करण्यात आला.कार्यशाळेत लैंगिक शोषण, स्पर्श, पालकत्वाचे प्रकार, तणावाचे प्रकार यावरही चर्चा झाली.




पालकांनी, शिक्षकानी आपापल्या भूमिकतून बाहेर पडून संवादकाची भूमिका स्विकारायला हवी. असे ठामपणे बोलले गेले. वैज्ञानिक, प्रगतीशील दृष्टीकोन आणि पारदर्शी असणाऱ्या व्यक्तीशी मुले अधिक मोकळेपणाने संवाद साधू शकतात. आरोग्यभान संस्थेचे डॉ. मोहन देस, श्रुती भिडे, रेणुका कल्पना,माणिकदादा पारधे यांनी संवादक या नात्याने विद्यार्थी, पालक शिक्षक यांच्या मनातील बरेचसे गोंधळ दूर दूर केले.

कार्यशाळेच्या आयोजनाबद्दल विद्यालयाचे संस्था अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, उपाध्यक्ष विवेक रेड्डी, सचिव कमलकिशोर अग्रवाल,

शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांनी समाधान व्यक्त केले

कार्यशाळा आयोजनामागील भूमिका विद्यालयाचे मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी आपल्या प्रास्तविकातून विस्तृतपणे विशद केली . कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, राहूल पांचाळ ,सुनिता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक - शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचा-यांनी परिश्रम घेतले.

## टीईटी पेपरफुटीची सीबीआय चौकशी करा; विरोधकांनी विधान परिषदेत शिक्षणमंत्र्यांचा मागितला राजीनामा!

**मुंबई/प्रतिनिधी :** शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटी प्रकरणावर महाराष्ट्र विधान परिषदेत सोमवारी विरोधकांनी सरकारला धारेवर धरले. या प्रकरणाची सीबीआय चौकशी करावी, शिक्षणमंत्री दादा भुसे यांची राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधकांकडून करण्यात आली. यावर चर्चेची मागणी केली असता ती सभापती राम शिंदे यांच्याकडून फेटाळण्यात आल्याने हौदात येत विरोधकांनी जोरदार घोषणा दिल्या, यावेळी झालेल्या गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले. शिवसेना (ठाकरे) सदस्य अंबादास दानवे, ज. मो. अभ्यंकर, काँग्रेसचे सतेज पाटील, अभिजित वंजारी, यांच्यासह अन्य सदस्यांनी नियम २८९ अंतर्गत कामकाज स्थगित करून या गंभीर विषयावर सविस्तर चर्चा घेण्याची मागणी केली.

# विरोधी पक्षनेते देविदास काळे यांच्या मध्यस्थीने मनपा कर्मचाऱ्यांचे आंदोलन मागे

## न्याय हक्कासाठी शासन व प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याची ग्वाही

**लातूर/प्रतिनिधी :** शहर महानगरपालिकेच्या कर्मचायांनी थकीत दोन महिन्यांचे वेतन तत्काळ मिळावे या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांकरिता मनपा आवारात काम बंद करून ठिय्या आंदोलन केले होते. या आंदोलनाची माहिती मिळताच विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी कर्मचारी व प्रशासक यांच्यात यशस्वी मध्यस्थी केल्याने सदर आंदोलन मागे घेण्यात आले आहे. कर्मचायांना तात्काळ दोन महिन्याचे वेतन देण्यात येईल, असा शब्द प्रशासनाने दिला असून इतर मागण्यांकरिता आपण स्वत: शासन व प्रशासन स्तरावर पाठपुरावा करू अशी ग्वाही मनपा विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी कर्मचायांना दिली आहे.

थकीत दोन महिन्याचे वेतन तात्काळ अदा करावे, सातवा वेतन आयोगाची थकीत रक्कम मिळावी आणि लोकप्रतिनिधी व कर्मचारी यांच्यामध्ये समन्वय समिती स्थापन करावी, यासह इतर मागण्यांकरिता शहर महानगरपालिका कर्मचायांनी आज काम बंद केले होते. केवळ काम बंद न करता या सर्व कर्मचायांना मनपा इमारतीत ठिय्या आंदोलनही केले होते. या आंदोलनाचा माहिती मिळाल्यानंतर मनपा विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी मनपा कर्मचायांशी संवाद साधला. यावेळी त्र्यांनी कर्मचायांना आपल्या मागण्या न्याय असून त्या तात्काळ पूर्ण होणे अपेक्षित असल्याचे काळे यांनी सांगितले. याबाबत आयुक्तांसोबत चर्चा करून यामध्ये मार्ग काढण्यात येईल, असा शब्द दिला. तसेच आगामी काळात कर्मचायांचे वेतन थकीत राहू नये, याकरिता जीएसटीचे वाढीव अनुदान व विशेष अनुदान प्राप्त व्हावे, याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्याकडे पाठपुरावा करू अशी ग्वाही दिली.

यानंतर देविदास काळे यांनी आयुक्तांसोबत चर्चा करून त्या कर्मचायांचे थकीत वेतन अदा करण्यासाठी आवश्यक असणारी कार्यवाही तात्काळ सुरु करावी, अशी मागणी दिली. या मागणीनुसार आयुक्ता मानसी मीना यांनी वेतन अदा करण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश देवून उद्यापर्यंत या कर्मचायांना वेतन प्राप्त होईल, असा विश्वास दिला. त्याच बरोबर लोकप्रतिनिधी व कर्मचारी यांच्यातील समन्वयासाठी समिती स्थापन करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया सुरू करण्याचेही स्पष्ट केले. आगामी सर्व साधारण सभेत सातवा वेतन आयोगाची फरक रक्कम मिळण्याकरिता ठराव मांडण्यात येईल, असेही सांगितले. कर्मचायांच्या मागण्यांबाबत झालेल्या चर्चेचा वृत्तांत देविदास काळे यांनी सांगितल्यानंतर कर्मचायांनी आपले आंदोलन मागे घेतले. सदर आंदोलनात यशस्वी मध्यस्थी केल्याबद्दल कर्मचायांकडून विरोधी पक्षनेते देविदास काळे यांचे आभार व्यक्त करण्यात आले.



हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.